मराठा विद्या प्रसारक समाजाचे,

# कला आणि वाणिज्य महाविद्यालय, सोयगाव

ता. मालेगाव, जि. नाशिक - ४२३२०३

## समाजदिन अहवाल – २०२०-२१

दि. १९/०८/२०२०

कर्मवीरांनी बहुजन समाजातील पिढ्या आणि पिढ्यांचा अज्ञानाचा अंधकार नष्ट करून त्यांच्या घरात ज्ञानज्योत पेटवले. यासाठीच्या त्यांच्या दृष्टिकोनातून मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेची स्थापना केली. त्यांच्या कार्याचा स्मरणासाठी संस्था दरवर्षी १९ ऑगस्टला आद्य कर्मवीर. रावसाहेब थोरात यांची जयंती समाज दिन म्हणून साजरा करते. कर्मवीरानी दाखवलेल्या मार्गावर चालण्यासाठी संस्थेचे सर्व पदाधिकारी कटिबद्ध आहोत. असे प्रतिपादन महावीर चे अध्यक्ष डॉक्टर तुषार शेवाळे यांनी केले.

मविप्र समाज संस्थेचे सोयगाव येथील कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय येथे समाज दिन समारंभात ते बोलत होते. डॉ. शेवाळे यांनी गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन करतानाच त्यांना भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या. माझी संचालक अॅड. आर. के. बच्छाव म्हणाले की आद्य कर्मवीरांनी संस्थेची स्थापना विशिष्ट कालखंड केली असली तरी त्यांचे कार्य मात्र चिरकाल टिकणारे आहे.

शिक्षण हे असे एकमेव साधन व संपत्ती आहे जी माणसाला परिपूर्ण संपन्न व समृद्ध करते त्याचे चोरी होण्याचा धोका नसतो विद्यार्थ्यांनी कर्मवीरांनी दाखविलेल्या मार्गावर चालून आपल्या लोकांचे कल्याण करावे. समारंभ स्थानिक व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सुरेश निकम, सदस्य आर पवार, प्राध्यापक देवा निकम, संजय महाले, डॉ. टी.पी. देवरे, सतीश पवार, अशोक देवरे, जयंत बच्छाव, विक्रम पवार, सुरेश बच्छाव, संजय पाटील, सतीश पगार व निलेश बच्छाव आदी प्रमुख पाहुणे होते.

प्राचार्य. डॉ. एच.एम. शिरसागर यांनी प्रास्ताविकात सोयगाव महाविद्यालयाच्या गुणात्मक व संख्यात्मक दर्जा कसा विस्तार आहे. याचा लेखाजोखा मांडला आगामी संकल्प विशद केले. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर हा कार्यक्रम विद्यार्थी व अन्य समाज घटकांसाठी फेसबुक लाईव्ह करण्यात आला. डॉ. शेवाळे यांच्या हस्ते संस्थेच्या ध्वजाचे ध्वजारोहण झाले. कार्यक्रमासाठी क्रीडा संचालक चंद्रशेखर मोरे, उपप्राचार्य मनोज जगताप, प्रा. बी. एस. आयरे प्रा.एस एम अहिरे, प्रा. पि. ढी. गोणार्क, प्रा.  राम सोनवणे, प्रा. निलेश नेरकर, प्रा. व्ही. एस. देसाई प्रा. अविनाश पगार व प्रा. नी. ती शेवाळे आदींनी परिश्रम घेतले. प्रा.सचिन शिंदे यांनी सूत्रसंचालन केले प्रा. गोरखराज गांगुर्डे यांनी आभार मानले.

H.O.D. Economics
Arts & Commerce College,
Soygaon, Tal. Malegaon Dist. Nashik

ARTS & COMMERCE, COLLEGE SOYGAON Tal. Malegaon (Nashik)

प्राचार्य
Principal
Arts & Commerce College
Soygaon, Tal.Malegaon (Nashik)

Maratha Vidya Prasarak Samaj's,

# Arts and Commerce College Soygaon

Tal. Malegaon, Dist. Nashik - 423203

## Samaj Day Report – 2020-21

**Date: 19/08/2020**

Karmaveer lit the flame of enlightenment in the Bahujan society by destroying the darkness of ignorance of generations and generations. From his point of view, Maratha Vidya Prasarak Samaj Sanstha was established. In commemoration of his work, the organization celebrates Adya Karmaveer on August 19 every year. Raosaheb Thorat's birth anniversary is celebrated as Samaj Day. All the officers of the organization are committed to follow the path shown by Karmaveeran. This assertion was made by Dr. Tushar Shewale, President of Mahaveer.

He was speaking at the social day function of MVP Samaj Sanstha at College of Arts, Science and Commerce, Soygaon. Dr. While congratulating the meritorious students, Shewale wished them all the best for their future endeavors. My Director Adv. R. K. Bachhao said that although Adya Karmaveer established the organization for a specific period of time, his work is eternal.

Education is the only tool and wealth that makes a man perfect and prosperous and there is no risk of theft. The ceremony was attended by Chairman of Local Management Committee Suresh Nikam, Member R Pawar, Professor Deva Nikam, Sanjay Mahale, Dr. T.P. Deore, Satish Pawar, Ashok Deore, Jayant Bachhao, Vikram Pawar, Suresh Bachhao, Sanjay Patil, Satish Pagar and Nilesh Bachhao were the chief guests.

Principal. Dr. H.M. In the introduction, Shirasagar explained how the qualitative and quantitative quality of Soygaon College has been expanded. An account of this was presented and the upcoming resolution was elaborated. In the background of Corona, this program was live on Facebook for students and other social groups. Dr. Shewale hoisted the flag of the organization. Sports Director Chandrasekhar More, Vice Principal Manoj Jagtap, Prof. B. S. Ayre Prof. SM Ahire, Prof. P. Dhee. Gonarak, Prof. Ram Sonawane, Prof. Nilesh Nerkar, Prof. V. S. Desai Prof. Avinash Pagar and Prof. Ni. Shewale and others worked hard. Prof. Sachin Shinde moderated Prof. Gorkharaj Gangurde proposed vote of thanks.

H.O.D. Economics
Arts & Commerce College,
Soygaon, Tal. Malegaon Dist. Nashik

ARTS & COMMERCE, COLLEGE SOYGAON Tal. Malegaon (Nashik)

**Principal**

Principal
Arts & Commerce College
Soygaon, Tal. Malegaon (Nashik)

ARTS & COMMERCE COLLEGE SOYGAON Tal Malegaon (Nashik)

# कर्मवीरांच्या मार्गासाठी कटिबद्ध : डॉ. शेवाळे

## सोयगाव महाविद्यालयात समाज दिन

सकाळ वृत्तसेवा

**मालेगाव, ता. १९ : कर्मवीरांनी बहुजन समाजातील पिढ्यान्‌पिढ्यांचा अज्ञानाचा अंधकार नष्ट करून त्यांच्या घरात ज्ञानज्योत पेटविली. यासाठीच्या त्यांच्या दूरदृष्टीतून मराठा विद्याप्रसारक समाज संस्थेची स्थापना केली. त्यांच्या कार्याच्या स्मरणासाठी संस्था दर वर्षी १९ ऑगस्टला आद्य कर्मवीर रावसाहेब थोरात यांची जयंती समाज दिन म्हणून साजरा करते. कर्मवीरांनी दाखविलेल्या मार्गावर चालण्यासाठी संस्थेचे सर्व पदाधिकारी कटिबद्ध आहोत, असे प्रतिपादन मविप्र अध्यक्ष डॉ. तुषार शेवाळे यांनी बुधवारी (ता. १९) येथे केले.**



**मालेगाव : मविप्रच्या सोयगाव महाविद्यालयात समाज दिन कार्यक्रमात बोलताना संस्थेचे अध्यक्ष डॉ. तुषार शेवाळे. शेजारी माजी संचालक ॲड. आर. के. बच्छाव, सुरेश निकम आदी.**

मविप्रच्या सोयगाव येथील कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात समाज दिन समारंभात ते बोलत होते. डॉ. शेवाळे यांनी गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन करताना त्यांना भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या. माजी संचालक ॲड. आर. के. बच्छाव म्हणाले, की आद्य कर्मवीरांनी संस्थेची स्थापना विशिष्ट कालखंडात केली असली, तरी त्यांचे कार्य मात्र चिरकाल टिकणारे आहे. शिक्षण हे असे एकमेव साधन व संपत्ती आहे जी माणसाला परिपूर्ण, संपन्न व समृद्ध करते. त्याची चोरी होण्याचा धोका नसतो. विद्यार्थ्यांनी कर्मवीरांनी दाखविलेल्या मार्गावर चालून आपल्या लोकांचे कल्याण करावे.

समारंभास स्थानिक व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सुरेश निकम, सदस्य अ. र. पवार, प्रा. देवा निकम, संजय महाले, डॉ. टी. पी. देवरे, सतीश पवार, अशोक देवरे, जयंत बच्छाव, विक्रम पवार, सुरेश बच्छाव, संजय पाटील, सतीश पवार, नीलेश बच्छाव आदी प्रमुख पाहुणे होते.

प्राचार्य एस. एम. सोनवणे यांनी प्रास्ताविकात सोयगाव महाविद्यालयाचा गुणात्मक व संख्यात्मक दर्जा कसा विस्तारत आहे, याचा लेखाजोखा मांडला. आगामी संकल्प विशद केले. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर हा कार्यक्रम विद्यार्थी व अन्य समाजघटकांसाठी फेसबुक लाइव्ह करण्यात आला. डॉ. शेवाळे यांच्या हस्ते संस्थेच्या ध्वजाचे ध्वजवंदन झाले. कार्यक्रमासाठी क्रीडा संचालक चंद्रशेखर मोरे, उपप्राचार्य मनोज जगताप, बी. एम. अहिरे, एस. एम. अहिरे, पी. डी. गोरावकर, राम सोनवणे, नीलेश नेरकर, व्ही. एस. देसाई, अविनाश पवार, नितीन शेवाळे आदींनी परिश्रम घेतले. सचिन शिंदे यांनी सूत्रसंचालन केले. गोरखनाथ गांगुर्डे यांनी आभार मानले.





ARTS & COMMERCE COLLEGE
SOYGAON
Tal. Malegaon (Nashik)





आपलं महानगर

# कर्मवीरांनी दाखवलेल्या मार्गावर चालण्यास कटिबद्ध

## डॉ. तुषार शेवाळे : मराठा विद्या प्रसारक समाज शिक्षण संस्थेत समाजदिन उत्साहात

नाशिक ● कर्मवीर रावसाहेब थोरात यांनी बहुजन समाजातील विद्यार्थ्यांच्या अज्ञानाचा अंधकार नष्ट करून त्यांच्या घरात ज्ञानाची ज्योत पेटविण्यासाठी दूरदृष्टी ठेवून संस्थेची स्थापना केली. कर्मवीरांच्या कार्याचे स्मरण करण्यासाठी मविप्र संस्था दरवर्षी कर्मवीर रावसाहेब थोरात यांची जयंती १९ ऑगस्ट रोजी समाजदिन म्हणून साजरी करत आहे. कर्मवीरांनी दाखवलेल्या मार्गावर चालण्यासाठी संस्थेचे सर्व पदाधिकारी कटिबद्ध आहेत, असे प्रतिपादन मविप्र समाज संस्थेचे अध्यक्ष डॉ. तुषार शेवाळे यांनी केले.

मराठा विद्या प्रसारक समाजाचे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, सोयगाव येथे समाजदिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी समाजदिन कार्यक्रम विद्यार्थ्यांसाठी फेसबुक लाईव्ह करण्यात आला, अशी माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एच. एम. क्षीरसागर यांनी दिली. सुरुवातीला डॉ. तुषार शेवाळे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. याप्रसंगी मालेगाव तालुका माजी संचालक अॅड. आर. के. बच्छाव, इंजि. सुरेश निकम आदी उपस्थित होते.

अॅड. आर.के. बच्छाव म्हणाले, कर्मवीरांनी संस्थेची स्थापना विशिष्ट कालखंडात केली असली तरी त्यांचे कार्य मात्र चिरकाल टिकणारे आहे. शिक्षण हे असे एकमेव साधन व संपत्ती आहे, जी




माणसाला आतून व बाहेरून संपन्न व समृद्ध करते. विद्यार्थ्यांनी कर्मवीरांनी दाखवलेल्या मार्गावर चालावे.

यावेळी स्थानिक व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सुरेश निकम, प्रा. देवा निकम, संजय महाले, डॉ. टी. पी. देवरे, सतीश पवार, अशोक देवरे, जयंत बच्छाव, विक्रम पवार, सुरेश बच्छाव, संजय पाटील, सविता पवार, निलेश बच्छाव आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन सचिन शिंदे यांनी केले. प्रास्ताविक प्राचार्य डॉ. एच. एम. क्षीरसागर यांनी केले, तर आभार प्रा. गोरखनाथ गांगुर्डे यांनी मानले.

H.O.D. Economics
Arts & Commerce College,
Soygaon, Tal. Malegaon Dist. Nashik

ARTS & COMMERCE COLLEGE
SOYGAON
Tal. Malegaon (Nashik)

Principal
Principal
Arts & Commerce College
Soygaon,Tal.Malegaon (Nashik)